परीक्षा स्वरूप

वेद राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेच्या (V.T.S.E.) तयारीसाठी :-
इ. १ ली ते ३ री व ५ वी ते ७ वी साठी मार्गदर्शिका व सराव प्रश्नपत्रिका संच तसेच ४ थी व ८ वी साठी सराव प्रश्नपत्रिका संच इ. साहित्य परीक्षा पॅकेज अंतर्गत उपलब्ध असेल.

'इ. ४ थी स्कॉलरशिप ठोकळा' ही परिपूर्ण मार्गदर्शिका आपणांस हवी असल्यास त्याचे स्वतंत्र शुल्क भरून आपणांस घेता येईल.
पेपर १ : मराठी व गणित – शुल्क रु. ३२०/-
पेपर २ : इंग्रजी व बुद्धिमत्ता – – शुल्क रु. ३२०/-

परीक्षेचे आयोजन व निकाल

- विद्यार्थ्यांच्या सोईनुसार तालुका स्तरावर किंवा मध्यवर्ती ठिकाणी परीक्षा केंद्राची व्यवस्था केली जाते.
- परीक्षेसाठीचे प्रवेशपत्र परीक्षेपूर्वी १ महिना अगोदर शाळांकडे दिले जाईल. प्रवेशपत्राशिवाय परीक्षा हॉलमध्ये प्रवेश मिळणार नाही.
- परीक्षेचा निकाल परीक्षेनंतर ६० दिवसांच्या आत लावला जाईल.
- परीक्षेचा निकाल वेद पब्लिकेशनच्या vedpublication.in या संकेतस्थळावर पहायला मिळेल.
- परीक्षेनंतर सर्व इयत्तांच्या प्रश्नपत्रिकांची अंतरिम उत्तरसूची वेद प्रकाशनच्या संकतेस्थळावर जाहीर होईल.
- अंतरिम उत्तरसूची प्रकाशित केलेनंतर ७ दिवसांचे आत उत्तरसूचीवरील सूचना स्वीकारल्या जातील. ७ दिवसांनंतर अंतिम उत्तरसूची प्रकाशित केली जाईल.

सर्वसाधारण बाबी

- सदरची परीक्षा ही पूर्णपणे ऐच्छिक स्वरुपाची असून विद्यार्थ्यांना या परीक्षेस बसवण्याची शिक्षक, शाळा वा पालक यांच्यावर कोणतीही सक्ती नाही.
- परीक्षेसाठी फॉर्म भरणेची मुदत ३० ऑक्टोबर पर्यंत राहील. विलंब शुल्कानुसार फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध असणार नाही.
- अपरिहार्य परिस्थितीत परीक्षेची तारीख / परीक्षेचे केंद्र / वेळ बदलण्याचा अधिकार परीक्षा संचालकांना राहील.
- अधिक माहितीसाठी कृपया आमच्या अधिकृत प्रतिनिधीशी किंवा परीक्षा ऑफिसला संपर्क करा किंवा संकेतस्थळाला भेट द्या.

परीक्षा समन्वयक संपर्क

रजि. नं. २१३१२००३१५२३६८७४
रजि. नं. को/१५९/२०२१

माई एज्युकेशन सोसायटी, भुदरगड संचलित

वेद राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षा (VTSE)

इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी

माहिती पत्रक
VTSE 2027

माध्यम : मराठी

वेद पब्लिकेशन
ता. भुदरगड, जि. कोल्हापूर. (महाराष्ट्र)
मो. 9421171355, 9284149380, 9404986723
Website : vedpublication.in
Email : vedpublication@gmail.com

सूज्ञ शिक्षक, पालक बंधू आणि भगिनी,

सध्याचे युग स्पर्धेचे युग आहे. यामध्ये आपल्या उज्ज्वल करिअर निर्मितीसाठी विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांना सामोरे जावे लागते. इ. १ ली ते ८ वी च्या स्पर्धा परीक्षा माध्यमातून विद्यार्थ्यांच्या स्पर्धा परीक्षांचा भक्कम पाया रचला जाईल हे निश्चित. शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा, एन्.एम्.एम्.एस्. परीक्षा, एन्.टी.एस्., राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा, MPSC, UPSC व इतर सर्व स्पर्धा परीक्षांचे स्वरूप व त्याची पायाभूत तयारी हे सर्व या परीक्षा माध्यमातून शक्य होणार आहे. विद्यार्थ्यांना शालेय वयातच या परीक्षांची आवड निर्माण व्हावी, त्याचबरोबर महाराष्ट्रातील अशा प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा शोध घेवून त्यांना प्रोत्साहित करणेसाठी माई एज्युकेशन सोसायटी' मार्फत **'वेद राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेचे'** आयोजन केले आहे. आपल्या विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मनस्वी सदिच्छा...!

संचालक
वेद राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षा

परीक्षेसाठी पात्रता

शासनमान्य शाळेतील इ. १ ली ते ५ वी आणि इ. ६ वी ते ८ वी शिकणारे सर्व विद्यार्थी या परीक्षेसाठी पात्र असतील.

परीक्षा : दिनांक फेब्रुवारी २०२७ **परीक्षेचा निकाल : एप्रिल २०२७**

परीक्षा वेळापत्रक

पेपर	इ. 1 ली व 2 री वेळ	इ. 3 री ते इ. 8 वी वेळ
पेपर पहिला	11.00 ते 12.00	11.00 ते 12.30
पेपर दुसरा		1.00 ते 2.30

(काही अपरिहार्य कारणांमुळे परीक्षा तारखेत व पेपर वेळापत्रकामध्ये बदल होऊ शकतो.)

परीक्षा फॉर्म भरण्याची अंतिम मुदत : ३० नोव्हेंबर २०२६

माई एज्युकेशन सोसायटी, भुदरगड संचलित

वेद राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षा (V.T.S.E.) 2027

(अभ्यासक्रम व विषयनिहाय प्रश्नसंख्या)

इयत्ता	पेपर	अभ्यासक्रम व विषयनिहाय संख्या	प्रश्न	गुण	वेळ
इ. 1 ली व इ. 2 री	1	मराठी (15 प्रश्न) + गणित (25 प्रश्न) + इंग्रजी (10 प्रश्न) + बुद्धिमत्ता चाचणी (25 प्रश्न)	75	150	$1\frac{1}{2}$ तास
इ. 3 री ते इ. 8 वी	1	मराठी (25 प्रश्न) + गणित (50 प्रश्न) +	75	150	$1\frac{1}{2}$ तास
	2	इंग्रजी (25 प्रश्न) + बुद्धिमत्ता चाचणी (50 प्रश्न)	75	150	$1\frac{1}{2}$ तास

स्पर्धा परीक्षेसाठी वेद पब्लिकेशनचे उपलब्ध साहित्य

V.T.S.E. परीक्षा पॅकेज

1 ली	2 री	3 री	4 थी
430	450	590	400

5 वी	6 वी	7 वी	8 वी
680	590	590	400

पारितोषिक

वेद प्रकाशनच्या प्रज्ञाशोध परीक्षेची गुणवत्ता यादी तीन स्तरीय असेल.

- राज्यस्तरीय गुणवत्ता यादी इयत्ता 1 ली ते 8 वी
- जिल्हास्तरीय गुणवत्ता यादी इयत्ता 1 ली ते 8 वी
- केंद्रस्तरीय गुणवत्ता यादी इयत्ता 1 ली ते 8 वी

गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात येईल.

केंद्रस्तर - परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येच्या ५% प्रमाणानुसार गुणानुक्रमे दिली जातील. यासाठी प्रत्येक वर्गाच्या परिक्षार्थींची संख्या किमान २० असल्यास हा नियम लागू होईल.